नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०१/०८/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

## गुन्हेगारांची कुंडली जुडविण्यात राज्यात जालना प्रथम, रायगड दुसरे नागपूर ग्रामीण तिसरे

तंत्रज्ञानाचे युगात पोलिस विभागाला ऑनलाईन करण्यासाठी राष्ट्रीय गुन्हे अन्वेशण ब्युरो अंतर्गत सीसीटीएनएस प्रणालीची अमलबजावणी होत आहे. गुन्हेगारांची पार्श्वभुमी जाणुन घेण्यासाठी हि प्रणाली पोलिसांना जाणुन घेणे फायदेशीर आहे. या प्रणालीचे जुन महिन्यात मुल्यमापन करण्यात आले. यामध्ये नागपुर ग्रामीण पोलीसांनी २४२ पैकी २२६ गुण मिळवुन राज्यात तिसऱ्या क्रमाकांची रॅकींग प्राप्त केलेली असुन नागपुर ग्रामीण पोलीसांचे नाव उज्वल केलेले आहे. यात प्रथम रॅकींग जालना पोलीस व दुसरी रॅकींग रायगड पोलीसांनी पटकावली आहे.

ऑनलाईन युगात पोलीस विभाग ऑनलाईन झाला आहे. कुठेही कोणतिही घटना घडली किंवा कोणत्याही ठाण्याअंतर्गत गुन्हा नोंद झाला, तर त्याची माहिती सीसीटीएनएस प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने भरली जाते. सीसीटीएनएस प्रणाली संपुर्ण देशात अवलंबविण्यात आलेली आहे. या प्रणाली अंतर्गत ही ICGS पोर्टल लिंक करण्यात आलेले आहे या पोर्टलच्या आधारावर पोलीस विभाग कोणत्याही गुन्हेगाराची पार्श्वभुमी क्षणात बघु शकतात त्याचेवर कोणत्या ठिकाणी किती गुन्हे आहेत याबाबतही त्यांना माहिती मिळते. जुन महिन्यात याचे मुल्यांकन करण्यात आले. त्याचे पहिला क्रमांक जालना, दुसरा क्रमांक रायगड व तिसरा नागपुर ग्रामीण यांनी पटकावुन आपले नाव राज्यात चमकाविले आहे.

**काय आहे सीसीटीएनएस प्रणाली ?**

पोलीस तपासाला मदतीसाठी क्राईम अॅन्ड क्रिमीनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टम (सीसीटीएनएस) प्रणाली सुरू करण्यात आलेली आहे यात कोणत्याही प्रकारच्या गुन्हयाची माहिती अद्यावत केली असते प्रथम खबरी अहवाल अर्थात FIR ते आरोपपत्र दाखल होईपर्यंत इत्थभुत माहिती माहितीचा यात समावेश होतो गुन्हयाचा तपासा, घटनास्थळ, अटक आरोपी, मुद्देमाल जप्त अशी माहिती यात असते.

**तीन महिने साईटवर असते माहिती.....**

१) कुठेही कोणतीही घटना घडली तरीही त्याची माहिती सीसीटीएनएस प्रणाली अंतर्गत किमान ४८ तासांच्या आत ऑनलाईन अपलोड केलेली जाते. साधारणत: ती FIR तीन महिने असते.

२) **citizen.mahapolice.gov.in** या साईटवर सर्वसामान्य नागरिक सुध्दा पोस्टे ला दाखल FIR, मिसींग, हरविलेले व्यक्ती, अनोळखी ईसमची पाहणी सहज करू शकतात. महिला विरोधातील अत्यांचारीच्या तक्रारी सोडुन सर्व माहिती येथे पाहता येते.

**अशी आहे रॅकींग**

| **क्रमांक** | **जिल्हा** | **पटकावलेले गुण** |
|---|---|---|
| प्रथम | जालना | २४२ पैकी२३२ गुण |
| द्वितीय | रायगड | २४२ पैकी २२८ गुण |
| तृतीय | नागपुर ग्रामीण | २४२ पैकी २२६ गुण |

सदर कामगिरी ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर व अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात CCTNS प्रभारी पोउपनि निशांत जुनोनकर व सीसीटीएसएस स्पॉक मपोना सबीया शेख, मपोशि चांदनी अंबादे तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोस्टे प्रभारी यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**